बारीकसारीक तडे/ क्रॅक जाऊ शकतात तसेच नैसर्गीक आपत्ती, भुंकप या मुळे देखील इमारतीला तडे जाण्याचा संभव आहे याची कल्पना लिहुन देणार यांनी लिहुन घेणार यांना दिलेली असुन त्या बाबत लिहुन देणार यांची जबाबदारी राहणार नाही.

7) लिहुन देणार हे रिअल इस्टेट रेग्युलेशन ॲण्ड डेव्हलपमेंट ॲक्ट 2016 मधील तरतुदी नुसार सदर इमारतीचे नकाशात अल्प प्रमाणात बदल करु शकतात तसेच सदरचे बदल नाशिक महानगरपालीका यांचे कडुन मंजुर करुन घेणे कामी लिहुन घेणार यांची संमती राहील.लिहुन देणार यांना नकाशात बदल करावयाचा असल्यास त्याची माहिती लिहुन देणार यांनी लिहुन घेणार यांना द्यावयाची आहे व सदरची माहिती मिळाले नंतर 7 दिवसाचे मुदतीत लिहुन घेणार यांनी लिहुन देणार यांना सदरची संमती द्यावयाची आहे.त्या कामी कोणताही वाद वा तक्रार लिहुन घेणार करणार नाहीत.

8) लिहुन घेणार व सदर प्रकल्पातील इतर बांधीव भागांची खरेदी घेणारे इसम एकत्रित अशी महाराष्ट्र सहकारी कायद्यान्वये गृहनिर्माण संस्था स्थापन करणे अगर अपार्टमेंट संस्था स्थापन करणे निश्चित झाल्यास त्याकामी लिहुन घेणार यांनी कोणतीही हरकत उपस्थित न करता सदर सस्थेचे सभासद होवुन कागदपत्रांवर सह्या देवुन कागदपत्रे इत्यादींची पुर्तता लिहुन देणार यांचेकडे करावयाची आहे. तसेच आणि त्या संस्थेच्या उपविधिप्रमाणे नियमांचे काटेकोरपणे पालन करावयाचे आहे. तसेच सदर संस्था नोंदणीकामी हिस्सेराशीप्रमाणे येणाऱ्या खर्चाची रक्कम,नोंदणी फी व आवश्यक त्या रक्कमा लिहुन देणार यांचेकडे जमा करावयाच्या आहेत.

9) वर कलम 1ब मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचा वापर लिहुन घेणार यांनी योग्य रितीने करावयाचा आहे. तसेच मिळकत, तिचे आजुबाजुचा पॅसेज स्वच्छ ठेवावयाचा आहे. मिळकतीचा वापर करतांना कायद्याने अमान्य प्रतिबंधीत असे ठरविलेले कोणतेही कृत्य अगर व्यवहार करावयाचे नाहीत. तसेच सहमालकांना त्रास होईल असे वर्तन करावयाचे नाही. सदरची मिळकत व्यवस्थित ठेवणेकामी



करावयाच्या दुरुस्त्या वेळचे वेळी स्वखर्चाने करावयाच्या आहेत. तसे करतांना कायद्याचे व नियमांचे उल्लघन करावयाचे नाही. इमारतीचे एलीव्हेशन बदलणार नाही, बाह्य रंगसंगती बदलणार नाही याची काळजी घ्यावी. सामाईक जिना, वापराचे पॅसेज इत्यादींचा मिळकतीचा वापर करतांना नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावयाची आहे. तसेच लेखी पुर्व परवानगी शिवाय कोणतेही बदल करावयाचे नाहीत. सदरील मिळकतीचे लिहुन देणार यांनी मंजुर बिल्डींग प्लॅनप्रमाणे बांधकाम केले असुन त्यात कोणत्याही प्रकारचे अतिक्रमित बांधकाम केलेले नाही. लिहुन घेणार यांनी भविष्यात सदरील मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचे अतिक्रमित बांधकाम करावयाचे नाही. मिळकतीचा वापर करतांना धोकादायक, अवजड, स्फोटक व इमारतीस इजा पोहचेल अशी कोणतीही वस्तु आणुन ठेवायच्या नाहीत तसेच अशा अवजड वस्तु वरील मजल्यावर नेआन केल्यामुळे जिना, कॉमन पॅसेज,इमारतीचा अन्य भाग,प्रवेशव्दार यांची मोडतोड होईल अगर तुटफूट होईल असे कोणतेही कृत्य केल्यास त्यामुळे होणाऱ्या नुकसानीची व परीणामांची जबाबदारी लिहुन घेणार यांचेवर राहील.

10) लिहुन घेणार यांना किंमतीचा भरणा करणेकामी कोणत्याही वित्तीय संस्थेकडुन कर्ज घ्यावे लागल्यास असे प्रकरण त्यांनी त्यांचे जबाबदारीवर स्वखर्चाने करावयाचे आहे. अशा कर्जाच्या रक्कमेचा परतफेडीची संपुर्ण जबाबदारी लिहुन घेणार यांचीच राहिल. अशा कर्ज रक्कमेचा बोजा लिहुन घेणार यांनी वर कलम 1ब मध्ये वर्णन केलेल्या मिळकती व्यतिरीक्त इतर कोणत्याही बांधीव भागावर निर्माण करावयाचा नाही. सदर कर्जाकामी करावा लागणाऱ्या कागदपत्रांसाठी व त्याकामी होणारा संपुर्ण खर्च हा लिहुन घेणार यांनी करावयाचा आहे.

11) वर कलम अ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीवर स्थापन केलेल्या संस्थेच्या लाभात हस्तांतरण करेपावेतो पाहणी व निरीक्षण करण्याचा हक्क व अधिकार लिहुन देणार यांना राहील.

Scanned by CamScanner